
WELCOME

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

शिरूर (कासार)



# Subject :- Economy (अर्थशास्त्र)



By

# Dr. Pandit Mule

Dept. of Economy

Kalikadevi College, Shirur (ka.)Dist.Beed

## ५.१ पैसा - अर्थ आणि उत्क्रांती

## Money - Meaning and Evolution

## प्रास्ताविक Introduction -

कोणत्याही अर्थव्यवस्थेतील व्यक्ती स्वयंपूर्ण नसते, म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तींवर अवलंबून राहावेच लागते. फार पूर्वीपासून मानवाने श्रम-विभागणीच्या तत्त्वाचा अवलंब केला आहे. तेव्हापासून एकमेकांमधील देवघेव किंवा विनिमय हा आनिवार्य ठरला आहे. पूर्वीच्या काळी विनिमय व्यवहार हे वस्तुविनिमय - पद्धतीने (Barter system) होत असे. वस्तुविनिमय म्हणजे वस्तुवस्तुंची देवाण-घेवाण होऊन एकमेकांच्या गरजा भागविणे होय. परंतु हे क्षेत्र असतांना त्यात अनेक अडचणी आल्यात, त्या अडचणींवर उपाय म्हणून चलन अस्तित्त्वात आले. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत काही महत्त्वाचे शोध लागलेले आहेत.

उदा. - यांत्रिक शाखात चाकाचा, विज्ञान शास्त्रात अग्नीचा व राज्यशास्त्रात

मतांध ज्याप्रमाणे शोध लागला त्याप्रमाणे अर्थशास्त्रात चलनाचा शोध अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. आज प्रत्येक अर्थव्यवस्था ह्या चलनप्रधान असून त्याभोवती ती फिरत आहे. प्रत्येक देशाचे चलन वेगवेगळे असते उदा. अमेरिकेचे डॉलर, इंग्लडचे पौंड, रशियाचे रूबल व भारताचा रूपया इ. असे जरी असले तरी त्या चलनाच्या (पैशाच्या) साहाय्याने किंवा आधाराने ती अर्थव्यवस्था आपली प्रगती करीत असते. म्हणून आधुनिक काळातील संस्कृतीचा मूळ आधारच चलन आहे.

## ३.१ पैसा - अर्थ आणि उत्क्रांती

Money - Meaning and Evoluation

चलन म्हणजे नेमके काय ? चलनाची कार्ये कोणती ? हे पाहण्यापूर्वी आणि पूर्वीच्या काळी वस्तु विनिमय पद्धतीत मानवाला कोणत्या अडचणी आल्यात याचा प्रथम विचार करू.

### वस्तुविनिमय पद्धतीतील अडचणी

Difficulties in Barter system

वस्तुविनिमय पद्धतीत येणाऱ्या अडचणी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव** (Lack of double co-incidence of wants) - समजा 'अ' ही व्यक्ती शेतकरी असून त्याच्याकडे गहु आहेत. तर 'ब' ही व्यक्ती विणकरी असून त्याच्याकडे कापड आहे. व या दोघांमध्ये वस्तुंची देवाणघेवाण होऊन एकमेकांच्या गरजा भागविल्या जात आहेत. परंतू 'अ' ह्या व्यक्तीला कापडाची गरज नसेल किंवा त्या विणकऱ्याला गव्हाची गरज नसेल तर त्या दोघांमध्ये विनिमय होतांना अडचणी निर्माण होतात. थोडक्यात दोन व्यक्तींमध्ये वस्तूंची देवाणघेवाण (विनिमय) होताना दुहेरी संयोग आवश्यक ठरतो. त्याचा अभाव असेल तर दोघांमध्ये विनिमय होणार नाही.

... common measure of

२) **सामाईक मूल्यमापनाचा अभाव** (Lack of common measure of value) - प्रत्येक वस्तुचे मुल्य वेगवेगळे असते, ते मोजणे महत्त्वाचे असते. उदा. 'अ' व्यक्तीजवळ गहू आहेत व त्याच्या मोबदल्यात त्यास अनेक वस्तू हव्या आहेत. म्हणजेच 'अ' व्यक्तीस १० किलो गव्हाच्या बदल्यात साखर, तुरडाळ, तांदूळ, रॉकेल, इ. वस्तुंचे किती नग मिळतील या बाबतीतील विनिमय दराची मोठी यादी त्यास स्वतःजवळ ठेववी लागेल. तसेच वस्तुचे विविध प्रकार असतात त्याची प्रतवरी देखील वेगवेगळी असंते. थोडक्यात विनिमयाचा दर निश्चित करण्याच्या बाबतीत अडचण निर्माण होते. यामध्ये एकास फायदा तर दुसऱ्यास तोटा सहन करावा लागतो.

३) **विभाज्यतेचा अभाव** (Lack of Divisibility ) - समजा एखाद्या शेतकऱ्याकडे गाय आहे व त्याच्या बदल्यात त्याला तांदूळ हवे आहेत. १ क्विंटल तांदूळ बरोबर १ गाय असा विनिमय दर असेल व गाय जवळ असणाऱ्या व्यक्तीला

फक्त ५० किलो ग्रॅम तांदळाचीच गरज आहे तर गाय अर्धी करता येणार नाही. थोडक्यात काही अशा वस्तु असतात की त्याचे विभाजन (तुकडे) करता येत नाही व जर केले तर ते नाश पावतात.

४) **संचयाची आवश्यकता** (Impossibility of storage) - वस्तुविनिमय पद्धतीत चलन अस्तित्वात नसल्याने भविष्यकाळाची तरतूद म्हणून वस्तुच साठवून ठेवल्या जात. परंतू त्यावर अनेक मर्याद पडतात. उदा. दुध, फळे, भाजीपाला या वस्तु नाशवंत असल्याने फार काळ साठवून ठेवता येत नाही. तसेच काही अवजड वस्तु असतात उदा.- लोखंड व पोलाद अशा वस्तूंचा साठा करणे अशक्य व खर्चिक ठरते.

**५) विलंबित देणी देण्याची अडचण** (Difficulties regarding pa-
ments in future) - आज आपण कोणत्याही विविध संस्थेकडून चलना
माध्यमाव्दारे कर्ज घेऊन त्याची परतफेड (मुद्दत व व्याज) हप्त्याने करतो. त्यामु
कर्ज देणार यामध्ये कोणतीही अडचण निर्माण होत नाही. परंतु वस्तुविनिमय पद्धत
कर्ज कशात द्यायचे ? व दिलेले कर्ज कसे वसुल करायचे असे अनेक प्रश्न निर्मा
होतात. तसेच उत्पादनाचे भूमी, श्रम, संयोजन हे घटक आहेत. त्यांना त्यां
कामाच्या मोबदल्यात अनुक्रमे खंड, मजुरी व नफा द्यावा लागतो. परंतु वस्तुविनि
पद्धतीने हे शक्य होत नाही.

**६) जमा-खर्च ठेवण्याची अडचण** (Problems of maintaining Ac-
counting) - वस्तुविनिमय पद्धतीत चलन वापरला जात नसल्याने जमा खर्च किं
हिशेब कसा ठेवायचा ही अडचण निर्माण होते. आज आधुनिक काळात चलनाच्या
वापरामुळे सर्व स्तरांवरील हिशेब व्यवस्थित ठेवू शकता.

वरील प्रमाणे पूर्वीच्या काळी वस्तूविनिमय पद्धत अस्तित्वात असतांना अडचणी
येत होत्या त्या अडचणींवर उपाय म्हणून किंवा त्या अडचणी येऊ नये म्हणून चलन
ह्या वस्तुचा उगम झाला.

### ५.१.१ पैशाची व्याख्या (Definiation of Currency)

विविध अर्थशास्त्रज्ञानी चलनाच्या ज्या व्याख्या सांगितल्या आहेत या पुढीलप्रमाणे-

१) **सेलिग्मन** - सार्वत्रिक स्विकार्यता असलेली कोणतीही वस्तु म्हणजे चलन होय''

(Money is one thing that possesses general acceptability" E.R.A. Seligman)

२) **क्राऊथर** - ''ज्या वस्तुचा उपयोग विनिमयाचे साधन म्हणून केला जातो आणि त्याचबरोबर मूल्यमापनाचे व मूल्यसंचयाचे कार्य करते, त्या वस्तुला चलन असे

म्हणतात."

("Money means anything that is generally acceptabl as a mean of exchange and at that ame time acts as measure and as a store of value" - Crowther)

३) **प्रा. जी.एन हाम** - "चलन या शब्दाचा उपयोग विनिमय मध्यम आणि मूल्यमापन ही दोन्ही कार्ये निर्देशित करण्यासाठी केला जातो."

("The word 'money' has been used to designate the medium of exchange as well as the standard of value - G.M.Halm)

४) **केन्स** - "ज्या वस्तु दिल्यामुळे कर्ज व मुल्याबाबतचे करार पूर्ण केले जातात आणि जिच्या रूपात सामान्य क्रमशक्ती साठविली जाते. अशा वस्तुला चलन म्हणतात."

५) **एफ. ए. वॉलकर** - Money is what money does " - F.A.walker

६) **डी,एच.राबर्टसन :** ''विनिमयाचे साधन म्हणून देण्याचे किंवा इतर देणी ज्या सार्वत्रिक होतो अशी कोणतेही वस्तु म्हणजे चलन होय.''

"Anything which is widely accepted in payments for goods or in discharge of other kids of businss of ligation is a called money.

**वरील चलनाच्या पैशाच्या व्याख्यांवरून काही ठळक बाबी पुढील प्रमाणे सांगता येतील.**

१. देशातील सर्व व्यक्तींकडून त्याचा विचार स्विकार केलेला असतो.

२. चलनामध्ये क्रमशक्ती असते म्हणजेच चलन देऊन गरजेची कोणतीही वस्तु किंवा सेवांची सहजपणे खरेदी करता येते.

३. चलनाचा उपयोग विनिमयाचे मध्यम तसेच मुल्य संचयासाठी केला जातो.

४. सर्व देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण करण्याकरिता, करार पूर्ण करण्याकरिता चलनाचा उपयोग केला जातो.

५. चलनाच्या सहाय्याने वस्तुप्रमाणेच सेवांचीही खरेदी-विक्री करता येते.